जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३६९ दिनांक - ०८/०९/२०२४**

लोणीकंद पोलिस स्टेशन पुणे शहर

## लोणीकंद पोलीसांनी गुन्हेगारी टोळीच्या आवळल्या मुसक्या
## टोळी कडुन देशी बनावटीचे एकुण ०७ पिस्टल व २३ जिवंत काडतुसे केले जप्त

लोणीकंद पोलीस स्टेशन,पुणे शहर गुन्हा रजिस्टर नंबर ८४७/२०२४,आर्म अॅक्ट कलम ३(२५), भा.न्याय संहीता कलम ३(५),महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१),१३५ अन्वये दाखल गुन्हयातील फिर्यादी व साक्षीदार हे सराईत गुन्हेगार असुन ते दिनांक २९/०८/२०२४ सासवड येथील दहीहंडीचा कार्यक्रम संपवुन हडपसर,मांजरी मार्गे कोलवडी येथिल त्यांचे राहते घरी येत असताना त्यांचा विरोधक सुमित उत्तरेश्वर जाधव व इतर यांनी पुर्ववैमनस्यातुन कट कारस्थान रचुन कोलवडी परिसरात सापळा लावुन नमुद गुन्हयातील फिर्यादी व साक्षीदार यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमुद गुन्हा घडलेनंतर गुन्हयाचे घटनास्थळी मा.पोलीस उपआयुक्त,परिमंडळ ४ पुणे शहर,श्री.हिम्मत जाधव, व मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे शहर श्रीमती प्रांजली सोनवणे,यांनी भेट देवुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक,लोणीकंद पोलीस स्टेशन,पुणे शहर श्री.पंडीत रेजितवाड, यांना सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या सुचना दिल्या.

त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.पंडीत रेजितवाड,यांचे मार्गदर्शना खाली तपास पथकाचे प्रभारी अधिकारी सपोनि रविंद्र गोडसे व तपास पथकातील अंमलदार यांची दोन पथके तयार करुन आरोपींचा शोध घेणेकरिता सासवड,हडपसर,कोंढवा,कात्रज परिसरात एक पथक तसेच चाकण,पिंपरी चिंचवड,मुळशी परिसरात दुसरे पथक रवाना करण्यात आले. पोलीस अंमलदार कैलास साळुंके,स्वप्नील जाधव,अजित फरांदे,शुभम चिनके,साईनाथ रोकडे,अमोल ढोणे,दिपक कोकरे यांचे पथकाने केलेल्या तपासात नमुद दाखल गुन्हा हा हडपसर,स्वारगेट,लोहियानगर येथील एन्जॉय ग्रुप मधील सदस्यांनी केला असल्याचे गोपणीय बातमीदारा मार्फतीने माहिती कळाली.त्या अनुषंगाने तपास पथकाने हडपसर भेकराईनगर परिसरात तळ ठोकुन एन्जॉय ग्रुप मधील सदस्यांची माहिती प्राप्त केली असता नमुद गुन्हयात एन्जॉय ग्रुपचे सदस्य यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.

नमुद आरोपींचा शोध घेत असताना गोपणीय बातमीदारा मार्फत मिळालेल्या बातमीनुसार आरोपी नामे **१)** शुभम ऊर्फ मॅटर अनिल जगताप, वय २७ वर्षे, **२)** सुमित उत्तरेश्वर जाधव, वय २६ वर्षे, यांना मुंढवा परिसरात सापळा रचुन ताब्यात घेण्यात आले.सपोनि रविंद्र गोडसे व पथकाने आरोपींकडे त्यांचे इतर साथीदारांबाबत विचारपुस करुन नवले ब्रिज कात्रज परिसरात शोध घेणेकामी सापळा लावुन आरोपी नामे

**३)** अमीत म्हस्कु अवचरे,वय २७ वर्ष, **४)** ओंकार ऊर्फ भैय्या अशोक जाधव, वय २४ वर्ष, **५)** अजय ऊर्फ सागर बाळकृष्ण हेगडे, वय २७ वर्ष, **६)** राज बसवराज स्वामी, वय २६ वर्ष, **७)** लतिकेश गौतम पोळ, यांना शिताफीने ताब्यात घेवुन त्यांच्याकडे तपास करता त्यांनी नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. दरम्यान आरोपी नामे अमीत अवचरे व सागर हेगडे यांचे ताब्यातुन देशी बनावटीचे ०२ पिस्टल व ०९ जिवंत काडतुस जप्त करण्यात आले. तसेच नमुद आरोपींना दाखल गुन्हयात अटक करुन त्यांची एकुण ०५ दिवसांची पोलीस कस्टडी घेण्यात आली.पोलीस कस्टडी दरम्यान आरोपीकडुन देशी बनावटीचे ०४ पिस्टल व १२ जिवंत काडतुस जप्त करण्यात आले.

**एकंदरीत दाखल गुन्हयाचे तपासात ०७ आरोपींना अटक करुन त्यांचेकडुन देशी बनावटीचे एकुण ०७ पिस्टल व एकुण २३ जिवंत काडतुसे, गुन्हा करण्यासाठी वापरलेली दोन वाहने, ०७ मोबाईल फोन असा एकुण ९,१४,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.**

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.अमितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.मनोज पाटील, मा. पोलीस उपआयुक्त,परिमंडळ ४,पुणे शहर,श्री.हिम्मत जाधव, मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे शहर, श्रीमती प्रांजली सोनवणे, यांचे मार्गदर्शनाखाली मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक,लोणीकंद पोलीस ठाणे,पुणे शहर, श्री.पंडीत रेजितवाड, तपास पथकाचे सपोनि रविंद्र गोडसे, पोलीस अंमलदार संदीप तिकोणे, कैलास साळुंके, स्वप्निल जाधव, अजित फरांदे, सागर जगताप, अमोल ढोणे, शुभम चिनके साईनाथ रोकडे,पांडुरंग माने, मल्हारी सपुरे, दिपक कोकरे, सुधीर शिवले सर्व लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर यांनी केली आहे.

